# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### शासनाच्या सामाजिक न्याय खात्याच्यावतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१) ३०८७ (०२-०६-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सामाजिक न्याय खात्याच्यावतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार करणाऱ्या राज्यातील जवळपास ७० शैक्षणिक संस्थांवर गुन्हे दाखल करण्याबाबत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी अनुक्रमे दिनांक ३० मार्च, २०१६, ३१ जानेवारी, २०१७, २७ फेब्रुवारी, २०१७, १४ मार्च, २०१७ व माहे एप्रिल, २०१७ असे ५ वेळा समाजकल्याण आयुक्तांकडून आदेश दिलेले असतानाही त्याची अंमलबजावणीच करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशाची संबंधित अधिकाऱ्याकडून अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील शिष्यवृत्तीत गैरव्यवहार केलेल्या केवळ दोन संस्थांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र ६८ संस्थांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कामात कसूर केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) संबंधित संस्था / महाविद्यालयांनी उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे याचिका दाखल केलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

शासनाचे ७० संस्थांवर गुन्हे दाखल करणेबाबतचे निर्देश होते. सदरील ७० संस्थांपैकी २ संस्था आदिवासी विभागाशी संबंधित आहेत. उर्वरीत ६८ संस्थांचा गोषवारा खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हे दाखल झालेल्या संस्थांची संख्या | ०४ |
| २ | मा.न्यायालयात प्रत्यक्ष आरोप पत्र दाखल झालेली प्रकरणे | १३ |
| ३ | मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे दाखल केलेल्या याचिकांवर स्थगिती दिलेली प्रकरणे | २८ |
| ४ | ज्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता नाही असे संबंधित सहाय्यक आयुक्त, यांनी कळविलेल आहे अशा प्रकरणांची संख्या | ११ |
| ५ | प्रकरणे न्यायप्रविष्ट परंतु न्यायालयीन प्रकरणामध्ये स्थगिती नसलेल्या संस्था | ०९ |
| ६ | मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निकाली. | ०३ |
| | एकूण | ६८ |

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील जिल्हा अपंग कल्याण पुनर्वसन केंद्र मागील दोन वर्षांपासून निधीअभावी बंद असल्याबाबत

**(२) ३२८३ (२८-०५-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रास निधीचा तुटवडा होत असल्यामुळे मागील २ वर्षांपासून बंद असल्यामुळे हजारो अपंग बांधवांना विविध योजनांच्या थेट लाभापासून वंचित रहावे लागत असून निधीअभावी दैनंदिन खर्च करणे हे देखील या अपंग पुनर्वसन केंद्रास अशक्य झाल्याची बाब माहे डिसेबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विरार येथील या जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रासाठी आवश्यक तेवढ्या निधीची नियमितपणे तरतूद करुन अपंग/दिव्यांगांना विविध योजनेचा लाभ मिळवून देण्याची मागणी वसई तालुक्यातील नागरिकांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर निवेदनाची प्रत या कार्यालयास प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सर्व शासकीय कर्मचारी, पोलीस आणि शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याबाबत

**(३) ३३६५ (२९-०५-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व शासकीय कर्मचारी, पोलीस आणि शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी न होण्यामागची आणि विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दिनांक १३ मार्च,२०२० अन्वये दिनांक १ एप्रिल,२०२० नंतर आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन खाते केवळ करार केलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन राष्ट्रीयकृत बँकेमध्ये आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन खाते असल्याखेरीज कोषागारांनी माहे एप्रिल,२०२० चे वेतन देयके पारित करु नयेत असे आदेश सदर शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

तद्नंतर वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दिनांक १३ ऑगस्ट, २०२० अन्वये आय.डी.बी.आय.बँक व प्रादेशिक ग्रामीण बँक (RRB) या शासकीय मालकीच्या बँकांना तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना(DCC) शासकीय बँकींग व्यवहार करण्यास तसेच सार्वजनिक उपक्रम/ महामंडळ यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकीसाठी मान्यता प्रदान करण्यात आली आहे

तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दिनांक ०३ मार्च, २०२१ अन्वये खाजगी बँकांना मर्यादित प्रमाणात शासकीय बँकींग व्यवहार हाताळण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. उपरोक्त आदेशांची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात येत आहे.

---

## मुंबईतील उपनगरीय रेल्वे प्रवासाचे नियोजन करण्याबाबत

**(४) ४९१८ (१४-१२-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात टाळेबंदीनंतर पुनश्च सुरु करण्यात आलेल्या उपनगरीय रेल्वे प्रवासाचे कलकत्ता येथील मेट्रोच्या धर्तीवर नियोजन करण्याबाबत तसेच मुंबईतील उपनगरीय रेल्वेतील गर्दीचे नियोजन करण्यासाठी कार्यालयीन वेळा बदलण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नियोजन करण्याकरिता राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदर समितीने शासनास केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार उक्त अहवालावर शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

शासनाने वेळोवेळी राज्यातील कोविड-१९ च्या महामारी काळात प्रादुर्भावाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार गर्दीच्या ठिकाणांचे नियोजन केले आहे. तसेच उपनगरीय रेल्वे प्रवासाकरीता मार्गदर्शक सूचना जारी करुन त्यांचे काटेकोरपणे पालन करुन रेल्वे प्रवास करण्यास टप्प्या टप्प्याने अनुमती दिली आहे.

---

## नागपूर मेट्रोसाठी निधी उभारतांना विकास शुल्कात १०० टक्के वाढ करण्यात आल्याबाबत

**(५) ८०७६ (१७-०३-२०२१) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेट्रोसाठी निधी उभारतांना विकास शुल्कात १०० टक्के वाढ करण्यात आली असल्यामुळे नागपूर शहरवासियांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाल्यामुळे सदर विकास शुल्क वाढीचा निर्णय मागे घेण्याबाबत नागरिकांनी व संघटनेने मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने त्वरित निर्णय घेवून सदर शुल्क तातडीने मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४ब अन्वये विकास व बांधकाम परवानगी प्रकरणी आकारणी करायची तरतूद आहे. कलम १२४ (२-१अ) नुसार राज्य शासनाने एक किंवा त्यापेक्षा अधिक महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्याचा आपला इरादा जाहीर केला असेल तर त्याबाबतीत कोणत्याही नियोजन प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात पोट कलम २ च्या तरतूदीन्वये १०० टक्के विकास शुल्क वाढ करण्याची तरतूद आहे. नागपूर प्राधिकरण क्षेत्रांतर्गत नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यानुसार १०० टक्के विकास शुल्क आकारण्यात येत आहे. आकारण्यात येत असलेल्या विकास शुल्कासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र. ८७६/२०२२ दाखल करण्यात आले असून सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.

---

## दिव्यांग बांधवांसाठी समाजकल्याण विभागामार्फत स्वतंत्र विभाग सुरू करण्याबाबत

**(६) ९३८७ (१३-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५३५ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांगासाठी जिल्हास्तरावर सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित स्वतंत्र विभाग निर्माण करण्याची कार्यवाही सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हास्तरावर समाजकल्याण विभागामार्फत दिव्यांगाचा विभाग सुध्दा सुरू असल्याने अधिकाऱ्यांच्या कामाची व्याप्ती वाढून अधिकाऱ्याना काम करण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर दिव्यांगासाठी स्वतंत्र विभाग नसल्याने दिव्यांगाच्या योजना चांगल्या प्रकारे राबविल्या जात नसल्याचे प्रशासनस्तरावर निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिव्यांगांसाठी पुणे येथे ज्याप्रमाणे स्वतंत्र आयुक्तालय निर्माण केले आहे त्याच धर्तीवर जिल्हास्तरावर जिल्हा दिव्यांग कल्याण अधिकारी व तालुकास्तरावर तालुका दिव्यांग कल्याण अधिकारी पदे निर्माण करुन दिव्यांगाच्या योजना राबविण्याबाबत व स्वतंत्र विभाग निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपन्यांतील अधिकारी/ कर्मचारी यांना फ्रंटलाइन वर्कस म्हणून घोषित करण्याबाबत

**(७) १४२८ (०९-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपन्यांतील कामगार, अभियंते व अधिकारी कोरोनाकाळात वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी अहोरात्र मेहनत घेत असून त्यांना पहिल्या फळीतील कर्मचारी (फ्रंटलाइन वर्कर्स) म्हणून घोषित करावे अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज कर्मचाऱ्यांना पहिल्या फळीतील कर्मचाऱ्यांचा दर्जा देवून त्यांचे तातडीने लसीकरण करावे, अशी त्यांच्या कामगार संघटनांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अधिकारी / कर्मचारी यांना फ्रंटलाइन वर्कर्स म्हणून घोषित करण्यात आले नसल्यामुळे महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनतर्फे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शने करून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपन्यातील कर्मचाऱ्यांना पहिल्या फळीचा दर्जा (फ्रंटलाइन वर्कर्स) घोषित करुन त्यांचे तातडीने लसीकरण करावे, यादृष्टीने कोणती कार्यवाही / उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१), (२) व (३) होय.
(४) केंद्र शासनाने राज्याच्या अत्यावश्यक सेवेत समावेश करण्यात आलेल्या सार्वजनिक आणि खाजगी वीज क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांचे प्राथम्याने लसीकरण करण्याबाबत राज्य शासनाला दिनांक २६/०४/२०२१ च्या पत्राने निर्देश दिले होते. यानुषंगाने वीज क्षेत्रातील सर्व कंपन्यांच्या अत्यावश्यक

सेवेतील कर्मचारी/ कामगारांकरीता कोव्हिड -१९ प्रतिबंधक लस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यासाठी योग्य सूचना निर्गमित करण्याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०३/०५/२०२१ च्या पत्रान्वये सार्वजनिक आरोग्य विभागास निर्देश देण्यात आले आहेत.

या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्याधिकारी व विभागीय आयुक्त यांना कार्यवाही करण्याबाबत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही कंपन्यांनी अर्धशासकीय पत्रे दिली होती व याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे संबंधित कंपन्यांनी नमूद केले होते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आश्रमशाळेत स्वच्छता कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करून भरणे तसेच पूर्ण वेतनावर रात्री सुरक्षारक्षकाची नेमणूक करण्याबाबत

**(८) ९४९७ (१३-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळेत स्वच्छता (साफसफाई) कर्मचारी नसल्याचे तसेच रात्री पाळी सुरक्षारक्षक हे मानधनावर काम करण्यास तयार नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने स्वच्छता कर्मचारी यांची पदे निर्माण करुन त्वरीत भरण्यात यावीत तसेच पूर्ण वेतनावर रात्री काम करणाऱ्या सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात यावी अशा मागण्या शाळा व्यवस्थापनाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी सुरू करण्यात आलेल्या शाहू, फुले, आंबेडकर निवासी/आदिवासी आश्रमशाळांना अनुदान मिळण्याबाबत

**(९) ९५२२ (१७-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी सुरू करण्यात आलेल्या शाहू, फुले, आंबेडकर निवासी/आदिवासी आश्रमशाळांसाठी दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानासंबंधी दिनांक २० एप्रिल, २०२१ च्या शासन परिपत्रकातील दिलेल्या निर्देशानुसार अंमलबजावणी करण्याबाबत सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी आयुक्त (समाजकल्याण) पुणे यांना दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी पत्र क्र.बीसीएच-२०१८/प्र.क्र.६१/शिक्षण-२ नुसार पत्रातील मुद्दा क्र.१ ते ७ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, केंद्रिय आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शाळांची तपासणी करुन प्रस्ताव शासनास सादर करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,
(३) असल्यास, प्रस्ताव सादर झालेल्या शाळांची संख्या किती व प्रस्ताव न सादर झालेल्या शाळांची संख्या किती, तसेच या सर्व शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी सुरू करण्यात आलेल्या शाहू, फुले, आंबेडकर निवासी/आदिवासी आश्रमशाळांना अनुदान मिळावे यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) दिनांक २८ एप्रिल, २०२१ च्या शासन पत्रान्वये शाहू, फुले, आंबेडकर योजनेंतर्गत अनुदान मंजूरी संदर्भात विविध पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सुचना आयुक्त, समाज कल्याण यांना देण्यात आलेल्या होत्या. तथापि, विहित निकषांच्या आधारे तपासणी करण्यात न आल्याने वैयक्तिक मान्यता व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही न करण्याबाबत सुधारित सुचना दिनांक १८ जून, २०२१ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(२) होय.
(३) व (४) शाहू, फुले, आंबेडकर योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आलेल्या १६५ आश्रमशाळांपैकी १६२ आश्रमशाळांचे अहवाल शासनास प्राप्त झालेले असून ३ आश्रमशाळा बंद आढळून आल्याने त्यांचे तपासणी अहवाल शासनास प्राप्त झालेले नाहीत. सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शासनस्तरावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे मांगले, (ता.शिराळा,जि.सांगली)१९९७-१९९८ या वर्षी १६६ प्लॉटसाठी गावठाणातील सर्वे नं. ३३२ मध्ये मंजूर करुन अनेक वर्षे होऊनही अद्याप त्यांची नोंद ७/१२ वर करण्यात आली नसल्याबाबत.

**(१०) १३४४७ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मांगले, (ता.शिराळा, जि.सांगली) येथे सन १९९७-१९९८ या वर्षी १६६ प्लॉटसाठी गावठाणातील सर्वे नं. ३३२ मध्ये मंजूर करुन अनेक वर्षे होऊनही अद्याप त्यांची नोंद ७/१२ वर करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्लॉटधारकांनी जमिनीचे पैसे शासनाकडे जमा केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रथम मंजूर केलेली १६६ प्लॉटमध्ये वाढ करुन २६६ लोकांना प्लॉट वितरित करण्याबाबतचे काम स्थानिक प्रशासन करित असल्याने मूळ १६६ प्लॉट धारकांना मंजूर प्लॉट देऊन उर्वरित प्लॉट धारकांसाठी गावठाणातील जागा वितरित करण्यात येणार, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिराळा तहसिलदार यांनी मूळ अधिकृत प्लॉट धारकांना गावठाणातील जागा वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मौजे मांगले, ता.शिराळा, जि.सांगली येथील गावठाण विस्तार योजनेखालील उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर यांच्या दिनांक २३/०१/१९९६ व दिनांक ३१/०१/१९९८ च्या आदेशान्वये १६६ भूखंडांचे आदेश करण्यात आले होते. त्यापैकी ज्या लोकांनी भूखंडाची शासनाने निर्देशित केलेली किंमत भरलेली आहे असे १३९ भूखंड व इतर सुविधेकरीता राखीव ठेवलेले ७ भूखंड असे एकूण १४६ भूखंडाचा ताबा फेरफार क्र. २२५००,२५७७७,२५७७८,२५७७९ व २७१४३ अन्वये भूखंडधारकांना दिलेला असून त्याची नोंद ७/१२ सदरी घेण्यात आली आहे. उर्वरीत २० भूखंडांचे अद्याप वितरण करण्यात आलेले नाही. त्यानुसार सदर जागेमध्ये रेखांकनानुसार केवळ १६६ भूखंड आहेत.

सदर योजनेतंर्गत भूखंड मंजूर करण्यात आलेल्या ७ भूखंडधारकांनी भूखंडाचा ताबा देण्याबाबत तहसिलदार, शिराळा यांच्याकडे दिनांक १०/१२/२०२१ रोजी अर्ज सादर केला होता.त्यानुसार तपासणी केली असता सदर ७ व्यक्तींना मंजूर केलेल्या भूखंडावर अन्य नागरीक वहिवाट व वापर करीत असल्याचे निदर्शनास आले होते. तथापि, सदर भूखंडांवरील अतिक्रमण अतिक्रमणधारकांनी स्वत:हून काढून घेतले असल्यामुळे सदर ७ भूखंडधारकांना त्यांना मंजूर भूखंडाचा कब्जा देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जरीपटका (जि.नागपूर) शहर पोलीस स्टेशन यांचे हद्दीतील गुरूनानक विद्यालयाजवळील कचऱ्याच्या ढिगात १५० ते २०० आधार कार्ड फेकून दिलेले आढळल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(११) १३५९५ (२२-११-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जरीपटका (जि.नागपूर) शहर पोलीस स्टेशन हद्दीतील गुरूनानक विद्यालयाजवळील कचऱ्याच्या ढिगात १५० ते २०० आधार कार्ड फेकून दिले गेले असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची तक्रार संबंधित जरीपटका पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली होती हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणात पोलीस स्टेशन जरीपटका, नागपूर शहर यांनी कचरा वेचणारा तसेच कचरा दुकानदार यांचे सविस्तर जबाब नोंदविले. या चौकशी दरम्यान कचरा वेचणाऱ्याने कचरा दुकानदारास विकलेल्या सामानात सापडलेले आधार कार्ड कचरा दुकानदाराला दिल्याबद्दल त्याचे बयाण नोंदवुन पिशवीमध्ये मिळुन आलेल्या आधार कार्ड पैकी काही जणांचे आधार कार्ड त्यांना परत केल्याबाबत त्यांचे सविस्तर जबाब नोंदविले आहेत.

तसेच उप डाकघर जरीपटका पोस्ट ऑफीस सीएमपीडीआय रोड तसेच वरिष्ठ अधीक्षक पोस्ट ऑफिस नागपुर शहर डाक विभाग यांना मिळालेल्या स्टॅम्प पेपरच्या आधार कार्डचे पाकीटावरती जरीपटका पोस्ट ऑफीस चे स्टॅम्प नोव्हेंबर, २०१९ ते फेब्रुवारी, २०२० दरम्यानचे दिसत असल्याने त्यांच्या कार्यालयातील जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे नावे निष्पन्न करून चौकशी संबंधाने हजर करण्याबाबत आणि त्यांचे स्तरावर सदर प्रकरणाची चौकशी गठीत करण्यासाठी कळविण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे पोस्ट ऑफिस जरीपटका येथे काम करणारे कर्मचाऱ्यांचे घटनेच्या अनुषंगाने जबाब नोंदविण्यात आले आहेत. तसेच वरिष्ठ अधीक्षक, पोस्ट ऑफिस, नागपूर विभाग, क्र. १ यांचे कडुन लेखी अहवाल प्राप्त करण्यात आला असून सद्य:स्थितीत घटनेची पुढील चौकशी पोलीस स्टेशन, जरीपटका येथे सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद नागपूर पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुधन योजनेंतर्गत हजारो लाभार्थी लाभापासून वंचीत असल्याबाबत

**(१२) १३६१६ (०१-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर) जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात पशुधन योजनेंतर्गत पाळीव पशुपक्षीचा लाभ लाभार्थ्यांना मिळणेकरीता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात सेस फंडातून ८० लाख व समाजकल्याण विभागाकडून सुमारे १० कोटी निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) सदर योजनेचा लाभ मिळण्याकरीता हजारो लोकांनी अर्ज केलेले असताना त्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नसून माहे मार्च,२०२२ अखेरपर्यंत योग्य नियोजन व कार्यक्षमतेअभावी सदर निधी पूर्ण खर्च झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वंचित लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये सेस फंडामधून पशुपक्षी खरेदीसाठी कोणतीही तरतूद प्राप्त झालेली नाही.

तथापि, समाज कल्याण विभागाकडून रुपये १२८३.१९ लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे.

(२) व (३) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये समाजकल्याण विभागाकडून रुपये १२८३.१९ लक्ष तरतूद प्राप्त झालेली आहे. सदर निधीपैकी दुभत्या जनावरांचा गट पुरवठा करणे या योजनेसाठी रुपये ४९९.१८ लक्ष व अनुसूचित जाती जमातीच्या कुटुंबांना शेळया मेंढ्यांचा गट पुरवठा करणे या योजनेकरीता रुपये ७८४.०१ लक्ष असा एकूण रुपये १२८३.१९ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ विशेष घटक योजनेंतर्गत दुधाळ वाटप योजनेचा लाभ घेण्याकरीता ६९७ लाभार्थी पात्र ठरले असून, या लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ विशेष घटक योजनेंतर्गत शेळी गट वाटप योजनेचा लाभ घेण्याकरीता १०५६ लाभार्थी पात्र ठरले असून निधीच्या उपलब्धतेनुसार १००९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औध (जि.सातारा) पोलीस ठाण्यामधील कुख्यात दरोडेखोर कोठडी तोडून पसार झाल्याबाबत

**(१३) १४१२७ (२५-०८-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औध (जि.सातारा) पोलीस ठाण्यामधील कोठडी तोडून कुख्यात दरोडेखोर पसार झाल्याची घटना नुकतीच माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस कोठडी तोडून दिवसाढवळया दरोडेखोर पसार होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ०९/०५/२०२२ रोजी औंध पोलीस ठाणे कोठडीत (जि.सातारा), औंध पोलीस ठाणे गु.र.नं. ०२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९५, ३९७, ३९८ मध्ये अटकेत असलेले एकूण ५ आरोपी कोठडीतून पळून गेल्याची घटना घडली आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने संबंधित आरोपींविरुध्द दिनांक ०९/०५/२०२२ रोजी औंध पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम २२४, ३५३, ३३२, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर घटनेत पळून गेलेल्या एकूण ५ आरोपी पैकी ४ आरोपींना पुन्हा अटक करण्यात आली असून एक आरोपी अद्यापही फरार आहे. औंध पोलीस ठाणेतील आरोपींनी पलायन केलेल्या घटनेच्या अनुषंगाने औंध पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व घटनेवेळी कर्तव्यावर उपस्थित इतर ४ पोलीस अंमलदार यांना तातडीने निलंबित करण्यात आले. सदर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करणेकामी प्राथमिक चौकशी करणेत आली असून सदर चौकशी अहवालाचे अनुषंगाने पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना संबंधित पोलीस घटक कार्यालयाकडून देय वार्षिक वेतनवाढ ३ वर्षाकरीता स्थगित का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील शिस्तभंग विषयक कारवाई सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गुन्हेगारीत वाढ झाली असल्याबाबत

**(१४) १४१४३ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२३३३ ला दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण अहवाल २०२० च्या अहवालानुसार ५ लाख ३९ हजार गुन्हयांची नोंद झाली असल्याचे दिनांक २८/०३/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ पेक्षा २९ हजार ५७० अधिकचे गुन्हे सदरील वर्षी नोंदवले गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालगुन्हेगारीत व महिलांवरील अत्याचारात झालेली वाढ, आर्थिक गुन्हे, ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हे यामध्येही मोठ्या प्रमाणात चिंताजनक वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने या वाढत्या गुन्हयांना रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) बालगुन्हेगारी (विधीसंघर्षग्रस्त बालक), महिलांवरील अत्याचार, आर्थिक गुन्हे या शिर्षामध्ये सन २०१९ पेक्षा सन २०२० मध्ये दाखल गुन्हयात घट आहे. ॲट्रासिटी अंतर्गत गुन्ह्यात सन २०१९ पेक्षा सन २०२० मध्ये दाखल गुन्ह्यात वाढ आहे.

| शिर्ष | सन २०१९ | सन २०२० | वाढ/घट |
|---|---|---|---|
| बालगुन्हेगारी | ४७४२ | ३७५२ | -९९० |
| महिलांवरील अत्याचार | ३७,११२ | ३१,९५४ | -५१५८ |
| आर्थिक गुन्हे | १३,४६८ | १०,८२४ | -२६४४ |
| ॲट्रॉसिटी (अ.जा.) | २,१५० | २,५६९ | +४१९ |
| ॲट्रॉसिटी (अ.ज. | ५५९ | ६६३ | +१०४ |

(४) महिला अत्याचाराच्या घटना रोखण्याच्या दृष्टीने महिला पोलीस मदत कक्ष स्थापन करणे, गंभीर गुन्ह्यांच्या बाबत मानक कार्यप्रणाली (SOP) जारी करणे, मुंबई शहरात निर्भया पथक स्थापन करणे, महिला विरोधी गुन्ह्यांवर प्रतिबंध आणण्यासाठी कडक कायदे विधीमंडळात संमत करणे, इ. उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस विभागाकडून अनुसूचित जाती व जमातीवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी गुन्हे ज्या ठिकाणी वारंवार होतात, त्याठिकाणी पोलीस अधिकारी हे वारंवार भेटी देऊन, नागरिकांच्या बैठका घेऊन जनजागृती करतात. या कायद्यातील तपास सुधारणाबाबत प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीता महाराष्ट्र पोलीस अकादमी व राज्यातील सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी क्षेत्रातील शाळेतील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळण्याबाबत

**(१५) १४४११ (२५-०८-२०२२) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६१५ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रातील शाळेतील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार एकस्तर वेतन श्रेणी लागू होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करताना सदर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आदिवासी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन अयोगाप्रमाणे एकस्तर वेतनश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत येत असलेल्या चारही अपर आयुक्त कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर सर्व कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे एकस्तर वेतन श्रेणीचा लाभ दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून नियमितपणे देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जलसंपदा विभागातील अभियंत्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) १४७६१ (२५-०८-२०२२) श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ११८०७ ला दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागांतर्गत माहे सप्टेंबर, २०२१ अखेर तांत्रिक (कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता संवर्गापर्यंत) संवर्गात मंजूर असलेल्या ९८१४ पदांपैकी ४०७५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक १० जून, २०२२ रोजी निकाल प्रसिध्द केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रसिध्द केलेल्या निकालानुसार रिक्त पदांच्या भरतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :** (१), (२) व (३) होय. खरे आहे.
(४) महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा २०१९ मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जलसंपदा विभागातील सहायक कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता श्रेणी-१ व सहायक अभियंता श्रेणी-२ या पदांवर शिफारस केलेल्या उमेदवारांमधील कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहिलेल्या उमेदवारांपैकी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आरक्षण प्रवर्गातून शिफारस झालेल्या ५५ उमेदवारांच्या संदर्भात प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने ते वगळून उर्वरित ५०१ उमेदवारांचे नियुक्ती आदेश दिनांक ०१/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील ताकारी सिंचन योजनेबाबत

**(१७) १४८४६ (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील गत ३० वर्षांपासून सुरु असलेल्या ताकारी सिंचन योजनेच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(२) तसेच, या योजनेवर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला व किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ताकारी सिंचन योजनेचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :** (१) ताकारी उपसा सिंचन योजनेंतर्गत मुख्य कालवा १ ते १४४ कि.मी., चिंचणी (अं) भरण कालवा १ ते ११ कि.मी. तसेच सोनसळ डावा कालवा १ ते २३ कि.मी. चे मातीकाम बांधकाम १००% पूर्ण झाले असून सदर कालव्यांचे एकूण अस्तरीकरणापैकी ९५% अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. तसेच सदर मुख्य / शाखा कालव्यांवरील वितरण व्यवस्थेचे (उघडा कालवा व बंदीस्त नलिका) ९५% काम पूर्ण झाले आहे.

ताकारी उपसा सिंचन योजनेंतर्गत एकूण २७४३० हे. क्षेत्रापैकी माहे जून, २०२२ अखेर २६५४८ हे. इतक्या क्षेत्रावर सिंचन निर्मिती करण्यात आली आहे. तसेच एकूण ८४२.२३ हे. क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झालेली असून उर्वरित ६४.२१ हे. इतक्या क्षेत्राचे भूसंपादन करणे प्रगतीत आहे.

ताकारी उपसा सिंचन योजनेंतर्गत मुख्य कालवा १ ते १४४ कि.मी., चिंचणी (अं) भरण कालवा १ ते ११ कि.मी. तसेच सोनसळ डावा कालवा १ ते २३ कि.मी. पर्यंत सिंचन आवर्तनांमध्ये पाणी सोडण्यात येत असून, सद्य:स्थितीत ताकारी प्रकल्पाच्या २५६४८ हे. क्षेत्र सिंचनाखाली आले असून त्यावरील सिंचनासाठीची नियमित पाणीपट्टी आकारणीही करणेत येत आहे.

ताकारी मुख्य/ शाखा कालव्यांवरील शेवटच्या घटकापर्यंत सिंचनासाठी पाणी पोहोचविण्याच्या दृष्टीने लाभक्षेत्र विकास कामे (CADWM) करण्याकरीता अंदाजपत्रके तयार करणे प्रगतीत आहे. तद्नंतर निविदेंतर्गत लाभक्षेत्र विकास कामे करण्यात येणार आहेत. सदर लाभक्षेत्र विकास कामे पूर्ण झाल्यानंतर ताकारी योजनेचे १००% क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

(२) कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाला चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक ०२/०८/२०१७ अन्वये प्रदान केली आहे. त्यामध्ये ताकारी उपसा सिंचन योजनेसाठी रुपये ११७८.६४ कोटी इतकी तरतूद असून माहे सप्टेंबर, २०२२ अखेर रुपये ८७०.८८ कोटी इतका खर्च झाला आहे. उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी रुपये ३०७.७५ कोटी इतका खर्च अंदाजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासी विकास विभागासाठी अंदाजित करण्यात आलेला निधीपैकी अखर्चित राहिलेला निधी पुन:श्च आदिवासी विभागाला अदा करण्याबाबत

**(१८) १५०७६ (३१-१०-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४-१५ ते सन २०२०-२१ या कालावधीत आदिवासी विकास विभागासाठी रुपये ६४ हजार २०१ कोटी एवढ्या रक्कमेची तरतूद अर्थसंकल्पात अंदाजित करण्यात आली परंतु प्रत्यक्षात रुपये ५१ हजार ४५२ कोटी खर्च करण्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्थसंकल्पात अंदाजित करण्यात आलेल्या निधीतून १२ हजार ७४९ कोटीच्या खर्चांची कपात केल्यामुळे आदिवासीच्या अनेक योजना राबविण्याकरीता निधीची कमतरता दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-२०१५ ते सन २०२०-२१ या कालावधीत कपात केलेला निधी चालू वित्तीय वर्षात आदिवासी विभागाला पुन्हा अदा करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-०१-२०२३) :** (१) व (२) सन २०१४-१५ ते सन २०२०-२१ या कालावधीत आदिवासी उपयोजनेसाठी खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यात आला आहे :-

(रुपये कोटीत)

| वर्ष | मंजूर नियतव्यय | वित्त विभागाकडून प्राप्त तरतूद | खर्च |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | ४६५१.४२ | ४५२५.७९ | ४०३२.६८ |
| २०१५-१६ | ५१७०.०० | ४८४१.३४ | ४५६२.५५ |
| २०१६-१७ | ५३५७.७२ | ५०७५.६० | ४९५७.७१ |
| २०१७-१८ | ६७८३.७४ | ६४०६.११ | ६१६२.९३ |
| २०१८-१९ | ८९६९.०० | ७५८७.९७ | ७२७४.१४ |
| २०१९-२० | ८५३१.०० | ७६११.५९ | ६८३३.५५ |
| २०२०-२१ | ८८५३.०० | ७६३७.८६ | ७४१५.४२ |
| एकूण | ४८३१५.८८ | ४३६८६.२६ | ४१२३८.९८ |

प्रत्येक आर्थिक वर्षाअखेरीस राज्याची वित्तीय स्थिती विचारात घेऊन शासनाच्या वित्त विभागामार्फत निधी उपलब्धतेचे प्रमाण ठरविण्यात येऊन प्रशासकीय विभागांना निधी वितरीत केला जातो. याप्रमाणे आदिवासी उपयोजनेकरीता वरीलप्रमाणे निधी प्राप्त झाला आहे. प्राप्त निधीतून अर्थसंकल्पित तरतुदींच्या सरासरी ८६ टक्केपर्यंत निधी आदिवासींच्या कल्याणाकरीता खर्च करण्यात आलेला आहे.

(३) अर्थसंकल्पिय तरतूद त्या त्या आर्थिक वर्षासाठी करण्यात येते. सदर आर्थिक वर्षामध्ये जो निधी अखर्चित राहील तो ३१ मार्च रोजी व्यपगत होतो व तो शासनास समर्पित करावा लागतो. सबब, सन २०१४-१५ ते सन २०२०-२१ या कालावधीतील समर्पित निधी आदिवासी विकास विभागाला पुन्हा अदा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विभागातील सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत

**(१९) १५०७७ (३१-१०-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागांतर्गत २० हजार ८३६ पदे मंजूर असतानाही तब्बल ७ हजार ३९१ पदे रिक्त असल्याची बाब सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापना शाखेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार माहे एप्रिल, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे आदिवासी विभागातील रिक्त पदांचे प्रमाण मंजूर पदांच्या तुलनेत ३५ टक्के इतके जादा झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने आदिवासी विभागातील सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि, राज्यातील ५५२ शाळांपैकी सद्य:स्थितीत ५३ शाळा विद्यार्थी संख्ये अभावी इ. १ ते ४ चे वर्ग व शाळा बंद झाल्यामुळे तेथील एकूण १७५९ पदे भरता येत नाही. त्यामूळे प्रत्यक्षात रिक्त पदांचे प्रमाण २७ टक्के आहे.

(३) अपर आयुक्त कार्यालयाच्या स्तरावरुन सन २०१८-२०१९ या शैक्षणिक सत्रात विशेष भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती त्यामध्ये शिक्षक, गृहपाल, अधीक्षक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे भरण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागाच्या सुधारीत आकृतीबंधानुसार कार्यालयनिहाय व शाळा निहाय पदाचे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांच्या मार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट क मधील लिपिकवर्गीय पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुकथनकर समितीने आदिवासी उपाययोजनेच्या कल्याणासाठी विविध योजनांसाठी जिल्हास्तरावर पुरेशा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) १५०७९ (३१-१०-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुकथनकर समितीने आदिवासी उपाययोजनेच्या कल्याणासाठी उपलब्ध करून दिलेला निधी विविध योजना राबविण्यासाठी खर्च करण्याची शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लहान पाटबंधाऱ्याच्या योजना मृद आणि जलसंधारण, ग्रामीण पाणीपुरवठा, जोडरस्ते, माता व बाल आरोग्य इत्यादी योजनांचा समावेश सुकथनकर समितीने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सुकथनकर समितीने योजना आदिवासींच्या कल्याणासाठीच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी जिल्हास्तरावर पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१३-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक २१/०१/१९९१ रोजीच्या शासन निर्णयानुसार श्री.द.म.सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उपसमितीने आदिवासी उपयोजना राबविण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या कार्यप्रणालीमध्ये शिफारशी सुचविल्या होत्या. राज्य नियोजन मंडळाच्या उपसमितीने त्यांच्या अहवालात केलेल्या सर्व शिफारशी स्विकारुन दिनांक २१/०९/१९९२ च्या शासन निर्णयान्वये सन १९९३-९४ पासून सदर शिफारशी अंमलात आणण्यात आल्या. त्यानुसार आदिवासी उपयोजनेंतर्गत जिल्हा योजनांना एकूण नियतव्ययापैकी ६०% ते ७०% निधी वितरीत करण्यात येत होता.

तथापि, वित्त विभागाने दिनांक २७/०१/२०१७ च्या शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ पासून योजनेत्तर व योजनांतर्गत खर्चाचे एकत्रिकरण करुन अनिवार्य खर्च व कार्यक्रमांवरील खर्च असे विभाजन केले. त्यामुळे योजनेत्तर खर्चामध्ये कार्यरत असणारा आस्थापना खर्च आता राज्यस्तरावरील कार्यक्रमांवरील खर्चामध्ये समाविष्ट झाला असल्याने आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावरील कार्यक्रम खर्चामध्ये आवर्ती दायित्व वाढले.

त्या अनुषंगाने दिनांक १३/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाकडून आदिवासी घटक कार्यक्रमाकरीता प्रतिवर्षी प्राप्त होणाऱ्या एकूण नियतव्ययाचे वाटप राज्यस्तरावरील घटक कार्यक्रम - ५५%, जिल्हास्तरावरील घटक कार्यक्रम-४०% व पेसा ग्रामपंचायतींना थेट अनुदान (अबंध निधी) करीता-५% याप्रमाणे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.